महाराष्ट्र शासन

अपर आयुक्त,आदिवासी विकास,अमरावती
पोलीस मुख्यालयासमोर,टी.बी.हॉस्पीटलमागे,कँप,अमरावती
दुरध्वी क्र.:०७२१-२५५३९६६/२५५३९६७,फॅक्स:२५५३९६८
ईमेल: atc.amr-mh@gov.in

---

क्र.शाआशा-२०१६/ प्र.क्र- / का-२ (ड) / 4604 / दिनांक :-२६/१०/२०१६

**तात्काळ/अतिमहत्त्वाचे**

**प्रति,**

प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
धारणी/पांढरकवडा/किनवट/ कळमनुरी/ अकोला/ औरंगाबाद

विषय :- पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंयोजना संबंधी दि.26/10/2016 च्या दै. लोकमत वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने नमुद दिनांकास करावयाच्या कार्यवाहीबाबत.

वरील संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, सन 2016-17 या शैक्षणिक वर्षात अनुसुचित जमातीच्या शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना इ.12 वी नंतरच्या उच्च शिक्षणाकरीता भोजन, विकास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंयोजना दि.15 ऑक्टोंबर,2016 च्या शासन निर्णयान्वये सुरु केली आहे.

सदर योजनेबाबत लोकमत वृत्तपत्रामध्ये मा.श्री. राजीव जाधव (भा.प्र.से.) आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी बातमी प्रसारीत केलेली आहे. शासननिर्णयात नमुद केलेल्या शहरातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश मिळालेल्या व तक्त्यात नमुद ठिकाणच्या वसतीगृहांसाठी ऑनलाईन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी नमुद कागदपत्रांच्या मुळ प्रती व त्यांच्या Scan copy ( सॉफ्ट प्रत पेन ड्राईव्हमध्ये) यासह नमुद दिनांकापैकी एका दिवशी अर्ज भरणे व कागदपत्रांच्या तपासणीसाठी उपस्थित रहावे अशा सुचना जाहिरातद्वारे आयुक्तांनी दिलेल्या आहेत. उपरोक्त जाहिरातीत नमुद केल्या प्रमाणे सदर योजनेकरीता विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता संबंधित गृहपालांनी कोणत्याही परिस्थितीत दि. 5/11/2016 पर्यत मुख्यालय सोडु नये तसेच या दरम्यान व जाहीराती मध्ये नमुद दिनांकास (दि.27 व 28 ऑक्टोंबर,2016 व दि.2 व 3 नोव्हेंबर 2016 ) गृहपालांनी त्यांचे वसतीगृहात पुर्ण दिवस हजर राहुन विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेणे बाबत आदेश दयावेत तसेच आपल्या कार्यालयातील प्रतिनिधीनी (दि.27 व 28 ऑक्टोंबर,2016 व दि.2 व 3 नोव्हेंबर 2016 दिनांकास वसतीगृहांना भेटी देवुन जाहीरातीत नमुदप्रमाणे गृहपालांकडुन कार्यवाही होत आहे याची खात्री करुन दयावी या करीता संबधिताना आपल्या स्तरावरुन आदेशित करावे.

तसेच गृहपालांकडून सर्व अर्ज दि.29/10/2016 ला प्राप्त करुन संबधित प्रकल्प अधिकारी यांनी सदर अर्जास त्याच दिवशी मंजुरी प्रदान करावी हीच कार्यवाही दि.04/11/2016 रोजी करावी.

शिक्षण
27/10

सर्व संस्थांना कळवावे

6667 27/10/16

एकंदरीत जाहीरातीनुसार नमुद दि.27 व 28 ऑक्टोंबर,2016 व दि.2 व 3 नोव्हेंबर 2016 विद्यार्थ्याचे अर्ज भरुन घेणे व त्या अर्जास मंजुरी देण्याची कार्यवाही करण्याची संपुर्ण जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील यांची नोंद घ्यावी.

अपर आयुक्त,
आदिवासी विकास अमरावती करीता

प्रत :- 1.मा. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

2.कुलसचिव अमरावती विद्यापीठ अमरावती/ कुलसचिव डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला/ कुलसचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद/ कुलसचिव स्वामी रामानंदतिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड /सहसंचालक उच्च व तंत्रशिक्षण विभाग अमरावती / औरंगाबाद यांना कळविण्यात येते की, जाहीरातीमधील ज्या बाबी महाविद्यालयाशी संबंधित आहे त्याबाबतचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यानी आदेशीत करावे.

प्रतिलिपी :-

1. प्राचार्य------------------------------------------------------------------------------------------

यांना कळविण्यात येते की, त्यांनी जाहीराती मध्ये प्रकाशित महाविद्यालयाच्या स्तरावरील अटी व शर्तीची पुर्तता बाबतचे दस्तऐवज / प्रमाणपत्र तातडीने विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन घ्यावे.

2. गृहपाल शासकीय आदिवासी मुलांचे /मुलींचे वसतीगृह ---------------------- ता.जि. -------------- ------- यांना कळविण्यात येते की त्यांनी दि. 27 व 28 ऑक्टोंबर,2016 व दि.2 व 3 नोव्हेंबर 2016 रोजी संपुर्ण दिवस वसतीगृहात हजर राहुन अर्ज भरुन घेवुन व त्यास प्रकल्प अधिकारी यांची मंजुरी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

अपर आयुक्त,
आदिवासी विकास अमरावती करीता

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/योजना/२०१६/ 3397
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 2 9 OCT 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, वरील पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.